# ती परत येते !

अलिबागला माईमकरांचा मोठा वाडा आहे. पेशव्यांच्या वेळी खाजगीमध्ये हरिभाऊ कारकून होते. त्यांनी प्रामाणिकपणे काम करून पेशव्यांची मर्जी सांभाळली होती. त्यातून पेशव्यांनी खुष होऊन त्यांना वाडा दिला होता. वाडा चांगला चौसोपी होता. पुढील दारी मारलेली हाक मागील दारी ऐकू जायची नाही. माईमकरांचा बारदानाही मोठा होता.

हरिभाऊ अतिशय प्रामाणिक असल्याने आणि अनेकांचे काम हरिभाऊंनी केले असल्याने त्यांना अनेक जण भेट देत.

घरच्या मंडळींना अनेक सोई पुरवत. त्याचा फायदा घरचे लोक घेत असत. हे हरिभाऊंना माहित नसायचं.

अक्षरश: लक्ष्मी घरात पाणी भरत होती. माईमकरांना चार मुले होती. त्यांच्या नशिबी मुलींची हौसमौज करण्याचे भाग्य नव्हते. चारही मुले बापानी मिळवलेला पैसा बसून खात होती. साठवलेले पाणी किंवा पैसा जन्मभर पुरत नाही. बापानी दाताच्या कण्या केल्या पण मुलांचे डोळे काही उघडत नव्हते. सर्वजण बेकार असल्याने बापाच्या पैशावर अवलंबून असल्याने घरातच ठाण मांडून राहिले होते. घरात एखादी नवी वस्तू आणण्याऐवजी घरातल्या वस्तूंनाच पाय फुटत. आता काय हरिभाऊ देवाघरी गेल्याने चारही मुलांना रान मोकळे झाले होते. जो तो आपापल्या मर्जीनुसार वागत होता. पैशाची आवक संपल्याने हरिभाऊंनी एक एक करून जमवलेली वस्तू बाहेर जाऊ लागली. आज वडिलांच्या सागवानी पलंग येईल त्या भावाने विकला. अशा कामासाठी कष्ट केले नसल्याने या मुलांना त्याची किंमत नव्हती. किमती खुर्च्या, घड्याळे, मोठमोठी पितळेची, तांब्याची भांडी यांनी बाजार पाहिला.

चारही मुलांच्या बायका मात्र कामसू होत्या. घरचे सर्व काम आवरून, पापड लोणची करून विकत होत्या, या सोबत आणि काही काम करून घरसाठी काही मदत करत होत्या.

गावातील हरिभाऊ माईमकरांची प्रतिष्ठा पाहून त्यांच्या मुलांची लग्ने झाली होती. चारही सुनांचा भ्रमनिरास झाला होता. आपल्या वडिलांनी मोठे घर पाहून त्यांचा विवाह केला होता. आता यांचा

बघूनच काय उपयोग होणार होता. म्हणून या सुनांनी अशा प्रकारचा गृहोद्योग चालू केला होता. धाकटी सुन देवीची आराधना करायची. देवीची पुजा करायची. देवीची स्तोत्रे म्हणायची.
पुरुषांना स्पष्ट बोलायची. ती म्हणायची, "पुरुषांसारखे पुरुष तुम्ही काम न करता घरी बसून खाता लाज कशी वाटत नाही ?
प्रत्येकाने रोज दहा रुपये जरी आणलेत तरी आम्हाला अभिमान वाटेल; त्या दहा रुपयांचे चुरमुरे खायला मिळाले तरी आनंद वाटेल".
हरिभाऊंच्या आजोबांनी हा वाडा बांधला; तेव्हापासून घरात सर्व धार्मिक कार्यक्रम चालू होते. बाहेरच्या सोप्यावर मोठी श्री गजाननाची मुर्ती बसविली जायची. आठ दहा दिवस मोठा समारंभ चालायचा.
गावातील अनेक जणं येऊन दर्शन घ्यायचे.
तसेच त्यांचेकडे दरवर्षी दसरा मोठ्या प्रमाणात साजरा व्हायचा.
दहा वर्षांपुर्वीची गोष्ट आहे.
हरिभाऊ माहीमकर यांचेकडे दरवर्षी प्रमाणे घटस्थापनेला नवरात्र सुरू झाले. घरात पैसा नव्हता, तरी धाकट्या सुनेने जमवलेली काही रक्कम या नवरात्रीसाठी खर्च केली. देव बसले. आरती झाली. दुपारी नैवेद्य दाखविला. दररोज जेवायला सवाष्ण होती. सकाळ संध्याकाळ आरती व्हायची. प्रसाद वाटला जायचा. नववे दिवशी रात्री देवीचा मुखवटा उभा रहायचा. सायंकाळी देवीची आरती व्हायची आणि काही स्त्रीयांच्या अंगात देवी संचारायची. भाविक लोक देवीचे दर्शन घ्यायचे. त्या रात्री देवीची आरती झाली आणि धाकट्या सुनेला भास झाला. उभ्या असलेल्या मुर्तीतून देवी बाहेर पडून घराबाहेर जाणाऱ्या दरवाजाकडे निघाली आहे ते पाहून धाकटी सून ओरडली, "आई, जरा थांब. मी तुझी खणा नारळाने ओटी भरते तोवर थांब". देवी म्हणाली, "आण. तोवर मी थांबते".
आणि ती नारळ आणण्यासाठी मागील दारी गेली. ती आलीच नाही. घरातल्या लोकांनी शोधाशोध केली. घरातील बायकांना एक पत्र सापडले. त्यात लिहीले होते, "बाबांनो, आता तरी जागे व्हा. कामाला लागा. कोणतेही काम लहान मोठे नसते. काम करून

स्वतःच्या पायावर उभे रहा. ती दरवाज्यात उभी आहे. केव्हाही ती घरातून जाऊ शकेल. माझा शोध घेऊ नका'.
दुसऱ्या दिवशी तिचा मृतदेह समुद्र किनारी सापडला. घरातील सर्व पुरूषांनी शपथ घेतली. आमची चूक झाली. आता मात्र आम्ही कामाला लागू. आणि तिच्या देहावर अंत्यसंस्कार केले.
आणि खरोखरच चौघेही कामाला लागले. प्रभाकर एका फर्ममध्ये जमाखर्च लिहीण्याचे काम करू लागला. सुरेश सुताराच्या हाताखाली काम ~~करू~~ लागला. रमेश रखवालदार झाला आणि उमेश हॉटेलमधे काम करू लागला. चौघांच्या बायकांचा गृहोद्योग चालू होताच. पुन्हा खेळीमेळीने संसार सुरू झाला.
चार वर्षांनी घरातून गेलेल्या वस्तूंनी आपल्या जागा घेतल्या.
~~[illegible]~~ नवरात्रात अष्टमीला देवीचा मुखवटा सजवला होता. आरास केली होती. सुखदाच्या फोटोला हार घातला होता. पुरूषांनी नवीन पोशाख घातला होता. सावित्री, शैला, नीला यांनी नऊवारी नेसून नथ घातली होती. त्यांनी देवीची खण नारळाने ओटी भरली. अशाप्रकारे ~~लक्ष्मी~~ लक्ष्मी घरी परत आली होती.

हस्ताक्षर : नीमा जोहरे

अरविंद लिमये
9146025756

